ePaper
“...तर अजित पवार नक्की मुख्यमंत्री होतील”: खासदार संजय काकडे



वर्ष - 7 । अंक -71 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- ‘पुणे मेट्रो’ चे काम पुन्हा सुरू!
- मोदींच्या टिळक पुरस्कारास विरोध!
- पवार गटाचे खातेवाटप ठरले !
- ठाकरेंना मानसोपचारांची गरज


www .mahaenews.com । बुधवार , दिनांक 12 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## खासदार डॉ. अमोल कोल्हेंनी घेतली प्रचारप्रमुखपदाची जबाबदारी;

# शिरुरमध्ये विलास लांडे यांना उमेदवारी?

### » शरद पवार गटाची नवी खेळी : आगामी लोकसभा निवडणुकीसाठी रणनिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) च्या राज्य प्रचार प्रमुखपदी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात प्रचाराचा झंझावात पहायला मिळणार असून, शिरुर लोकसभा मतदार संघाच्या रिंगणात कट्टर समर्थक माजी आमदार विलास लांडे यांना उमेदवारी देण्यात येईल, अशी शक्यता आहे.**

राष्ट्रवादीतील अजित पवार गट शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर शरद पवार गटाकडून आगामी निवडणुकांकरिता जोरदार मोर्चेबांधणी करण्यात येत आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ‘स्वराज्यरक्षक संभाजी’ मालिकेतील शंभूराजेंच्या भूमिकेमुळे राज्यातील घराघरांत पोहोचलेले शिरुर लोकसभेचे विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

‘सेलिब्रेटी प्रचारक’ असलेले डॉ. अमोल कोल्हे राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) राज्य प्रचारप्रमुख म्हणून काम पाहणार आहेत. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत डॉ. कोल्हे शिरुरमधून निवडणूक लढणार नाहीत. त्यांना राज्यातील ४८ लोकसभा मतदार संघामध्ये भाजपाविरोधी प्रखर विचारांचा झंझावात तेवत ठेवावा लागणार आहे. अजित पवार आणि प्रमुख नेत्यांच्या बंडखोरीमुळे मूळ राष्ट्रवादी कमकुवत झाली असून, पक्ष संघटना मंजबूत करण्याची भूमिका डॉ. कोल्हे यांना पेलावी लागणार आहे. त्यामुळे डॉ. कोल्हे यांना जास्तीत-जास्त जागा निवडून आणण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे.



### निष्ठावंत विलास लांडे यांची अग्निपरीक्षा...

राष्ट्रवादीत बंडखोरी झाल्यानंतर शरद पवार यांचे निष्ठवंत असलेले विलास लांडे यांनी अद्याप आपली भूमिका जाहीर केलेली नाही. लांडे यांच्या घरातील मंदिरात शरद पवार यांचा फोटो आहे. पक्ष संघटनेत अनेकदा डावलेले असतानाही लांडे यांनी शरद पवार यांची साथ कधीही सोडलेली नाही. त्यामुळे पवार संकटात असताना लांडे त्यांच्या साथीला राहतील, असे संकेत आहेत. विशेष म्हणजे, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि लांडे यांचे अत्यंत मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामुळे शरद पवार आणि जयंत पाटील यांच्या साथीने “शिरुर गड” सांभाळण्याची जबाबदारी लांडे यांच्या खांद्यावर सोपवण्यात येईल. त्याला विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या झंझावाती प्रचाराची जोड मिळाल्यास शिरुरमध्ये “शरद पवार समर्थक खासदार विलास लांडे” निवडून येतील, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### डॉ. कोल्हे यांना राज्यसभेवर संधी...

**»दुसरीकडे, डॉ. कोल्हे यांच्या ऐवजी शिरुर लोकसभा मतदार संघातून शरद पवार यांचे पट्टशिष्य आणि पिंपरी-चिंचवडमधील राजकीय पटलावरील ‘चाणक्य’ माजी आमदार विलास लांडे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात येईल. याबाबत स्वत: शरद पवार सकारात्मक असून, डॉ. कोल्हे यांना ‘सांस्कृतिक कोट्यातून’ राज्यसभेवर खासदारपदी नियुक्ती देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. शरद पवार यांनी आगामी लोकसभा निवडणूक प्रतिष्ठेची केली असून, प्रसंगी स्वत:ची राज्यसभेची जागा डॉ. कोल्हे यांना देण्याची तयारी केल्याचे मुंबईतील खास सूत्रांकडून समजले आहे.**

---

# धर्मांतराचा “विखार” आता पिंपरी-चिंचवडमध्ये!

### » तीन महिलांविरोधात गुन्हा : वाकड पोलिसांची रहाटणीत कारवाई

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रहाटणी येथे धर्मांतराबद्दल मनपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करण्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात तीन महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याप्रकरणी वाकड पोलिसांनी तीनही महिलांना नोटीस बजावत समज दिली आहे. बायबल वाचा, येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवा असे म्हणून ३९ वर्षीय तक्रारदार यांना विश्वासात घेऊन धर्मांतर करण्याचा प्रयत्न तीन महिलांनी केला असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३९ वर्षीय तक्रारदार यांच्या घरी तीन महिला वारंवार येऊन तुम्ही येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवा असे म्हणून बायबल वाचून दाखवत होत्या. याबाबत अनेकदा तक्रारदार महिलेने आम्हाला हे काही समजत नाही. आम्हाला या गोष्टीमध्ये पडायचं नाही असं समजावून सांगितलं होतं. सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास तीनही महिला तक्रारदार यांच्या घरी बळजबरीने शिरल्या, त्यांनी तक्रारदार यांना पुन्हा अशाच प्रकारची बळजबरी करत येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यास सांगत मनपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला.




महिलांना पोलिसांकडून समज... मनपरिवर्तन करताना तक्रारदार यांनी संबंधित तीनही महिलांना बाहेर जाण्यास सांगितलं. परंतु, त्या बाहेर जात नव्हत्या, अखेर त्यांच्या पुतण्याला बोलवून घेऊन महिलांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. तरीही त्या जात नसल्याने अखेर पोलिसांना बोलावण्यात आलं.

संबंधित महिलांबाबत वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धर्माबद्दल मनपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीनही महिलांना वाकड पोलिसांनी नोटीस बजावत समज दिली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक जवादवाड यांनी दिली.

# ‘पुणे मेट्रो’ चे काम पुन्हा सुरू!

## » चौकातील वाहतुकीस अडथळा येऊ न देता काम करावे : मगर

**» वाहतूक शाखेच्या पोलीस आयुक्तांनी दिली रस्त्यावर बॅरिकेडिंगला परवानगी**



। पुणे/ लोणावळा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणेरी मेट्रोच्या हिंजवडी-शिवाजीनगर मार्गाचे मागील महिन्यापासून बंद असलेले काम लवकरच सुरू होणार आहे. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी गणेशखिंड रस्त्यावर बॅरिकेडिंगला परवानगी दिल्याने मेट्रोच्या कामातील अडथळा अखेर दूर झाला आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) कृषी महाविद्यालय चौकातील रस्ता दुरुस्त करून मेट्रोचे काम दोन ते तीन दिवसांत सुरू केले जाणार आहे.**

मेट्रोच्या कामासाठी कृषी महाविद्यालय चौकात बॅरिकेडिंगसाठी पीएमआरडीएने वाहतूक पोलिसांकडे परवानगी मागितली होती. जून महिन्यात पुण्यात जी-२० कार्यगटाच्या दोन बैठका झाल्या. याचबरोबर पालखी सोहळाही पुण्यातून पुढे गेला. यामुळे मेट्रोच्या कामासाठी बॅरिकेडिंगला परवानगी देण्यात आली नव्हती. त्यानंतरही वाहतूक पोलिसांनी बॅरिकेडिंगला परवानगी न दिल्याने गणेशखिंड रस्त्यावर मेट्रोचे काम बंद होते.

आता बॅरिकेडिंगची परवानगी वाहतूक पोलिसांनी दिल्याने काम सुरू होणार आहे. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी गणेशखिंड रस्त्यावर मेट्रोच्या कामाची पाहणी केली. कृषी महाविद्यालय चौकात मेट्रोच्या कामामुळे केवळ तीन मीटर रस्ता वाहतुकीसाठी खुला राहणार आहे. त्यामुळे या चौकातील रस्त्यावरील चेंबर समतल पातळीवर आणून आणि रस्ता दुरुस्त करण्याची सूचना त्यांनी केली. चौकातील वाहतुकीस अडथळा येऊ न देता काम सुरू करावे, असे मगर यांनी पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना सांगितले. त्यानुसार कार्यवाही करून दोन ते तीन दिवसांत मेट्रोचे काम सुरू होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. हिंजवडी ते शिवाजीनगर हा मेट्रो मार्ग २३ किलोमीटरचा आहे. याच मार्गावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक ते ई-स्क्वेअर या दरम्यान दुमजली उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. या पुलाची लांबी १.७ किलोमीटर असणार आहे. हा उड्डाणपूल मेट्रोच्या कामाचा भाग असणार आहे. बॅरिकेडिंगला परवानगी नसल्याने मेट्रोचे काम जून महिन्यापासून रखडले असून, त्यामुळे काम पूर्ण होण्याच्या कालावधीवर १० ते १५ दिवसांचा परिणाम होऊ शकतो, असे सूत्रांनी स्पष्ट केले.

> “ कृषी महाविद्यालय चौकात मेट्रोच्या कामासाठी बॅरिकेडिंगला वाहतूक पोलीस उपायुक्तांनी परवानगी दिलेली आहे. बॅरिकेडिंग करून लवकरच हे काम सुरू होईल. वाहतुकीस फारसा अडथळा येऊ न देता हे काम केले जाईल.
> – **आर. एल. ठाणगे,** कार्यकारी अभियंता, पीएमआरडीए

# मोदींच्या टिळक पुरस्कारास विरोध

## » पुरस्कार देण्यास पुणे शहर काँग्रेसचा विरोध

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लोकमान्य टिळक पुरस्कार देण्यास काँग्रेसने विरोध दर्शविला आहे. मोदी यांच्या लोकशाही विरोधी धोरणांविरोधात काँग्रेस सतत्याने लढा देत आहे. त्यामुळे काँग्रेसच्या नेत्याने मोदी यांना पुरस्कार देणे योग्य नाही, असा आक्षेप काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे. त्याबाबतची जाहीर नाराजी काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे लेखी स्वरूपात व्यक्त केली आहे.**



लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त १ ऑगस्ट रोजी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ येथे होणाऱ्या कार्यक्रमात ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते मोदी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ट्रस्टचे विश्वस्त सुशीलकुमार शिंदे या वेळी उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, अजित पवार, देवेंद्र फडणवीस या पुरस्कार वितरणाच्या निमित्ताने एकाच व्यासपीठावर असल्याने त्याबाबत चर्चा सुरू झाली आहे. मात्र, काँग्रेसने मोदी यांना पुरस्कार देण्यास आक्षेप नोंदविला आहे. त्यामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसचे अन्य नेते सातत्याने भारतीय जनता पक्षाच्या लोकशाही विरोधी धोरणाविरोधात लढा देत आहेत.

रोहित टिळक काँग्रेसचे विद्यमान प्रदेश सरचिटणीस आणि विद्यार्थी काँग्रेसचे माजी अध्यक्ष रोहित टिळक यांनी या पुरस्काराची घोषणा केल्याने शहरातील काँग्रेस कार्यकर्ते नाराज झाले आहेत. त्याबाबतची नाराजी शहराध्यक्ष म्हणून माझ्याकडे नोंदविण्यात आली आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांची जाहीर नाराजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे लेखी स्वरूपात कळविण्यात आली आहे, असे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी ‘लोकसत्ता’ शी बोलताना सांगितले. काँग्रेसने विरोधाची भूमिका घेतल्यामुळे या पुरस्कार प्रदान सोहळ्यावरून वाद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# १७ नागरिक हिमाचल प्रदेशातील पुरात अडकले



। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

जिल्ह्यातील काही नागरिक हिमाचल प्रदेश राज्यात पर्यटनासाठी गेले आहेत. यामध्ये गेल्या दोन दिवसांत १७ जणांचा संपर्क होत नसल्याने या व्यक्तींच्या नातेवाईकांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधला आहे. या १७ पैकी मंगळवारी दहा व्यक्तींचा संपर्क झाला असून ते सुरक्षित स्थळी असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी जिल्हा प्रशासनाला दिली. उर्वरित सात पर्यटकांचा संपर्क होत नसल्याने त्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून राज्य शासनाला देण्यात आली.

उत्तरेकडील राज्यात सध्या अतिवृष्टी सुरु असून पूर आला आहे. त्यामुळे तेथील जनजीवन विस्कळित झाले आहे. या राज्यांत जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर नागरिक पर्यटनासाठी जातात. ४ ते ९ जुलैपर्यंत चंदीगढ ते हिमालच प्रदेशातील मनाली येथे पर्यटनासाठी गेलेल्या १७ व्यक्तींचा संपर्क होत नसल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी जिल्हा प्रशासनाला दिली होती. उर्वरित सात व्यक्तींशी संपर्क होत नसल्याने याबाबतची माहिती राज्य शासनाला देण्यात आली असून राज्य शासन हिमाचल प्रदेशातील स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात आहे. संबंधित व्यक्तींपर्यंत संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

# समान नागरी कायदा अन् गैरसमज!

## ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. नंदू फडके : समाजात जनजागृती करण्याची आवश्यकता

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**अल्पसंख्याक समुदायाला भडकवण्यासाठी समान नागरी कायद्याविषयी जाणूनबुजून गैरसमज निर्माण केले जात आहेत. वास्तविक देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी गरजेच्या असलेल्या समान नागरी कायद्यासाठी विरोधकांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे" असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. नंदू फडके यांनी पिंपरीतील नेहरूनगर न्यायालय सभागृहात केले.**



पिंपरी – चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशन आयोजित व्याख्यानात महाराष्ट्र – गोवा बार कौन्सिलचे माजी सदस्य ॲड. नंदू फडके 'समान नागरी कायदा' या विषयावर बोलत होते. पिंपरी – चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतीश गोरडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते; तसेच ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुदाम साने, असोसिएशनच्या उपाध्यक्ष ॲड. जयश्री कुटे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी नीलेश बचुटे यांचा पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. ॲड. सतीश गोरडे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून, "पिंपरी – चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशनची नूतन कार्यकारिणी धडाडीने काम करीत आहे" असे गौरवोद्गार काढून, "विधी आयोगाने समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सूचना मागविल्या असून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. संविधान हा ग्रंथ विधी शाखेतील अभ्यासकांनी नित्यनेमाने वाचला पाहिजे; कारण अनेक प्रश्नांची उत्तरे त्यामध्ये सापडतात!" असे मत व्यक्त केले. ॲड. सुदाम साने यांनी शुभेच्छा दिल्या; तर नीलेश बचुटे यांनी कृतज्ञता व्यक्त केली

पिंपरी–चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नारायण रसाळ यांच्या संकल्पनेतून व्याख्यानमाला आयोजित होत असून प्रसंगी बार असोसिएशनचे खजिनदार ॲड. विश्वेश्वर काळजे, ऑडिटर राजेश रणपिसे सदस्य ॲड. सौरभ जगताप, ॲड. प्रशांत बचुटे, ॲड. देवराव ढाळे, माजी अध्यक्ष ॲड. सुहास पडवळ, माजी अध्यक्ष ॲड. सुनील कडूसकर, ॲड. जिजाबा काळभोर, ॲड. सुनील कदम, ॲड. सोहम यादव, ॲड. अल्पना रायते आणि इतर वकील बंधू – भगिनी व विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांनी संयोजनात परिश्रम घेतले. असोसिएशनचे सचिव ॲड. गणेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. विश्वेश्वर काळजे यांनी आभार मानले. सामुदायिक वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. डॉ. आंबेडकरांनी समान नागरी कायद्याची अनिवार्यता मांडली... ॲड. नंदू फडके पुढे म्हणाले की, "समान नागरी कायदा हा विषय विधी अभ्यासकांसाठी खूप जवळचा अन् जिव्हाळ्याचा आहे. खरे म्हणजे पन्नास वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समान नागरी कायद्याची अनिवार्यता मांडली होती. त्याचवेळी या कायद्याची अंमलबजावणी केली असती तर देशाची प्रगती खूप आधीच झाली असती. भारतीय दंड संहिता आणि अन्य कायदे देशात लागू असल्यावर त्यांच्यासोबत समान नागरी कायदा अस्तित्वात आणायला हवा होता. शहाबानो खटल्यात तत्कालीन पंतप्रधानांनी अल्पसंख्याक समुदायाच्या दबावाखाली आणि मतांचे राजकारण करीत नवा समांतर कायदा पारित करून सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय निष्प्रभ केला.

> " आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत पाचव्या स्थानावर असल्याने या प्रगतीचे अनेक विरोधक अल्पसंख्याकांच्या नावाने खोटे अश्रू ढाळत आहेत. या पार्श्वभूमीवर मुस्लीम बांधवांना परदेशातील सुरक्षासंबंधीचे कडक कायदे आणि नियम याविषयी जाणीव करून दिली पाहिजे. समान नागरी कायद्याविरोधात देशात अनेक ठिकाणी अराजक माजवले जाईल; परंतु त्याबाबत नागरिकांनी सतर्क अन् दक्ष राहिले पाहिजे. धर्म हे फक्त साधन असून मानवी कल्याण हे देशातील कायद्यांचे अंतिम ध्येय असले पाहिजे. गणपती उत्सवात, आनंदाच्या प्रत्येक कार्यकमात उस्ताद बिस्मिल्ला खाँ यांची सनई भक्तिभावाने लावली जाते; तसेच प्रत्येक मुस्लीम हा देशद्रोही नाही, ही वस्तुस्थिती दोन्ही बाजूंनी लक्षात घ्यायला हवी.
>
> **- ॲड. नंदू फडके,** ज्येष्ठ विधिज्ञ

---

# मोशीतील जलवाहिनी, पाण्याच्या टाकीचा 'शुभारंभ!

## मोशी–बोऱ्हाडेवाडी परिसरातील नागरिकांना दिलासा : आमदार महेश लांडगे यांचा पुढकार

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मोशी-बोऱ्हाडेवाडी येथील ८०० मी. मी. जलवाहिनी आणि पाण्याची टाकी उभारण्याच्या कामाला सुरूवात करण्यात आली. त्यामुळे परिसरातील सुमारे ५० लाख नागरिकांना होणारा पाणीपुरवठा नियोजन सक्षम होणार आहे, अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली.**



भोसरी विधानसभा मतदार संघांतर्गत पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या पुढाकाराने मोशी येथील सेक्टर-१२ येथे पाण्याची टाकी आणि बोऱ्हाडेवाडी येथील जलवाहिनी भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला. ८०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी सावतामाळीनगर येथून टाकण्यात येत आहे.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे, माजी महापौर राहुल जाधव, माजी स्थायी समिती सभापती विलास मडिगेरी, माजी नगरसेविका नम्रता लोंढे, सारिका बोऱ्हाडे, अश्विनी जाधव यांच्यासह हनुमंत लांडगे, सोनम जांभूळकर, वंदना आल्हाट, निलेश बोराटे, निखील बोऱ्हाडे, निखील काळकुटे, शिवराज लांडगे, राजेश सस्ते, गणेश सस्ते, रवी जांभुळकर, नितीन बोऱ्हाडे, संतोष जाधव, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता रामनाथ टकले, उप अभियंता शेखर गुरव, कनिष्ठ अभियंता विजय लाडे, अनिल इदे आदी मान्यवर व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

### समाविष्ट गावांमध्ये विकासाला प्राधान्य...

**» आमदार लांडगे म्हणाले की, बोऱ्हाडेवाडी, देहुरस्ता, शिवरोड आदी परिसरातील सुमारे ५० हजार नागरिकांचा पाणीपुरवठा सुरळीत होईल. तसेच, भाजपाच्या माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे आणि कुटुंबियांनी सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा विचार करुन आपल्या खासगी मालकीच्या जागेतून जलवाहिनी टाकण्यासाठी प्रशासनाला जागा उपलब्ध करुन दिली. याबद्दल बोऱ्हाडे कुटुंबियांचे आभार व्यक्त करतो. समाविष्ट गावांतील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी आम्ही प्राधान्य दिले असून, एक-एक प्रकल्प पूर्ण करताना विशेष समाधान वाटत आहे.**

# बाईपण भारी देवा : जगणं नव्यानं गवसल !



चित्रपट समीक्षण

दीपक चौगले

**आयुष्यच राहाटगाडगं चालवताना कुटुंबकबिल्यातील नानाविध नातेसंबंध जपणं आणि टिकवणं हे प्रत्येकाच्या प्रवृत्तीवर अवलंबून राहत असतं. अशावेळी महिलावर्गाची प्रचंड कुचंबणा होत राहते किंवा किंबहुना ती परंपरागत चालत आलेली आहे आणि त्याचा स्वीकार महिलावर्ग आतापर्यंत करत आला आहे.**

यामध्ये रक्तातील नात्यांचा भावनिक गुंता सोडवताना असंख्य तडजोडी कराव्या लागतात. यावेळी मनाला होणाऱ्या यातना, वेदना, त्याग, एकमेकांविषयी असणारी असूया, द्वंद हा पराकोटीचा होतो. मात्र हे सर्व जेव्हा आपण मागे वळून पाहतो तेव्हा हातून जशी वाळू सरकन निसटून जाते तसा आयुष्यातील खूप मोठा पट सरकन निसटून गेलेला असतो. आणि तो हरवलेला संवाद एकमेकींत घुसळण्यासाठी, मनापासून दुरावलेली सख्खी आपली माणसं घरट्यात परत येण्यासाठी केलेली धडपड आणि संसारातील पुरुषी अहंकार आणि लादलेल्या जबाबदारीच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी सहा बहिणी एकत्र येतात आणि घडतं 'बाईपण भारी देवा'. संपूर्ण सिनेमाला पकडून ठेवणारा धागा म्हणजे मंगळागौर. ही कथा आहे जया, शशी, साधना, केतकी,पल्लवी आणि चारू या सहा बहिणीची. कथा पुढे सरकत जाताना या सहाही बहिणीचा भूतकाळ हा वर्तमानात डोकावत राहतो. एकत्र कुटुंबात वाढलेल्या या सहा जणींचा भूतकाळ आणि वर्तमान हा भिन्न, परस्परविरोधी असतो. दरम्यान, या सर्व जणी आता एकमेकीसोबत विचित्र, फटकून का वागत असतात त्याच मूळ हे भूतकाळात दडलेले असत. आणि ते मध्ये मध्ये प्रसंगातून प्रेक्षकाला उमजत जात. ते काय आहे हे तुम्ही प्रत्यक्षात बघा. ते बघण्यातच @ खरी मजा आहे आणि हाच गुंता तुम्हाला खिळवून ठेवतो. पारंपरिक पद्धतीत गुरफटलेली आजची स्त्री, पुरुषी मानसिकतेच्या जोखडात अडकलेली स्त्री आणि सर्वात महत्वाचे म्हणजे बहिणी - बहिणीमध्ये आलेली कटुता कशा पद्धतीने दूर करण्यात मंगळागौर कारणीभूत ठरते हे पाहण रंजक आहे.



जयाची भूमिका साकारणाऱ्या रोहिणी हट्टंगडी यांचा भूतकाळातल्या प्रसंगातून डोकावणारा गूढ अभिनय अफलातून आहे. वंदना गुप्ते यांची शशी तर खूपच भाव खाऊन गेलीय. सुकन्या कुलकर्णी यांनी उभा केलेली साधना तिच्या देहबोलीतून अगदी परफेक्ट. केतकी (शिल्पा नवलकर), पल्लवी (सुचित्रा बांदेकर) आणि चारू (दीपा परब)यांनी प्रत्येक प्रसंगातून आपली छाप पाडली. एकूणच काय तर केदार शिंदेंनी केलेली पात्रांची निवड चपखल बसलीय.

थोडक्यात सिनेमा कथेतून काही भाष्य करत राहतो मात्र ते कुठेही प्रेक्षकांवर 'भारी ' पडत नाही, इथेच सिनेमा आपल वेगळेपण दाखवतो. सर्वांनी एकदा पहावा असा 'बाईपण भारी देवा '

## संपादकीय »

### पर्यावरण 'मॅनेजमेंट'

***नैर्ऋत्य मोसमी वारे आणि अरबी समुद्रातून पश्चिमेकडून गेलेले वारे यांचा संगम हिमाचल प्रदेशावर झाल्याने त्या राज्यात ढगफुटीसारखा पाऊस पडला. हे कारण झाले.***

नैर्ऋत्य मोसमी वारे आणि अरबी समुद्रातून पश्चिमेकडून गेलेले वारे यांचा संगम हिमाचल प्रदेशावर झाल्याने त्या राज्यात ढगफुटीसारखा पाऊस पडला. हे कारण झाले. पण असे काही पहिल्यांदाच झाले असे नाही. बरोबर दहा वर्षांपूर्वी उत्तराखंड राज्यावर या दोन वात मोहिमांचा असाच संगम झाला आणि त्या राज्यास पावसाने न भूतो न भविष्यति असे झोडपले.

म्हणजे या काळात असे होऊ शकते याचा अंदाज आपणास होता. तसा तो व्यक्तही करण्यात आला होता. पण तरीही व्हायचे ते झालेच आणि सत्तरएक जण प्राणास मुकले. दहा वर्षांपूर्वी उत्तराखंडाच्या देवभूमीत यापेक्षा अधिक जीवितहानी झाली होती आणि काही महत्त्वाच्या धर्मस्थळांचेही नुकसान झाले होते. या वेळी मुख्य तडाखा हिमाचलास बसला आणि देवभूमी तशी तुलनेने बचावली.

**आयुष्यभर राजकारण केलेल्या शरद पवार यांना वयाच्या या टप्प्यावर जे काही पाहायला लागतंय, ते पाहता शेक्सपियरचा 'किंग लियर' आठवत राहतो. याच 'किंग लियर'ला आधार मानून शिरवाडकरांनी मराठीत 'नटसम्राट' लिहिलं. त्यात गणपतराव, ज्या उद्विग्नतेने ' मी रागावणार नाही, रागावून काय फायदा आहे? या आगीसमोर मी रडणार नाही' असं म्हणतात. आज तशीच उद्विग्नता आज पवारांच्या डोळ्यात दिसतेय.**

## पवार आणि शेक्सपियरचा 'किंग लियर'!

जगविख्यात नाटककार विल्यम शेक्सपियर याचं 'किंग लियर' हे गाजलेले शोकान्त नाटक. ८३ वर्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची अवस्था पाहतांना, हे नाटक नव्या संदर्भात आठवत राहतं.वि. वा. शिरवाडकरांच्या नटसम्राट या नाटकाची प्रेरणा किंग लियर हेच नाटक होतं. शिरवाडकरांचा नटसम्राट गणपतराव बेलवलकर हा नाट्य अभिनेता आहे. आज पवारांचा अवस्था त्या नटसम्राटासारखीच झालीय. राजा लियर आपली संपत्ती तीन मुलींच्यात समान वाटून द्यायचं ठरवतो. कुणाचं किती प्रेम आहे सांगताना, मोठ्या दोन्ही मुलींच्या तुलनेत छोटी मुलगी राजाला सांगते की, कोणत्याही मुलीचं आपल्या पित्यावर जितकं प्रेम असावं तितकचं प्रेम असल्याचं सांगते. लियर तिच्यावर नाराज होतो. खरं ती त्याची सर्वात लाडकी मुलगी असते. पण, ती आपल्या शब्दांमधे बदल करत नाही.

राजा आपली संपत्ती दोन मुलींमध्ये वाटून टाकतो. छोट्या मुलीस संपत्तीतून



बेदखल करतो. तिथून मनस्वी, अहंकारी किंग लियरची शोकान्तिका सुरू होते. लियरचे रुपान्तर एका वेड्या माणसामध्ये होते. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतल्या शिलेदार आणि वारसदारांनी सत्तावाटप होण्याची वाटच पाहिली नाही. शत्रूच्या गोटाशी संगनमत करून त्यांनी आपल्याबरोबर पक्षच पळवून नेला आणि पवारांना बेघर करून टाकले.

८३ व्या वर्षी पवारांना उरल्यासुरल्या साथीदारांच्या मदतीने पुन्हा नव्याने पक्षबांधणी करावी लागतेय. प्रश्न एकट्या पवारांचा नाही. वारस म्हणून ते ज्यांना पुढे आणू पाहतात त्या सुप्रिया सुळे यांच्या अस्तित्वाचादेखील आहे. किंग लियरसारखी शरद पवारांची शोकान्तिका होणार नाही. कारण लियरला जे अवगत नव्हते ते पवारांच्याकडे आहे.

सत्ता कशी टिकवायची, त्याचा अधिकाधिक लाभ कसा उठवायचा हे त्यांना ठाऊक आहे. प्रतिस्पर्ध्यांना कळणार नाही अशा चाली रचण्यात ते माहीर आहेत. त्यांच्या इतका मुरब्बी, ताकदवान नेता आजघडीला तरी देशात नाही. लियरसारखी नसली तरी तशाच प्रकारच्या वेगळ्या शोकान्तिकेला मात्र ते सामोरे जात आहेत.

शेक्सपियरचे नायक मुळातच धैर्यवान, महान असतात. त्यामुळे जीवनाच्या रंगमचावरले त्यांचे कोसळणे अधिक करूणाजनक असते. शरद पवार हे कोसळणारे पुरूष नाहीत. ते झुंजार आणि लढावू बाण्याचे नेते आहेत. आज वय त्यांच्या साथीला नसले तरी त्यांनी हार पत्करलेली नाही. या टप्प्यावर तरी पवारांचं राजकारण शोकान्त नाटकाच्या उंबरठ्यावर उभे आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सुंदर तें ध्यान उभे विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनियां ॥१॥
तुळसीचे हार गळां कासे पीतांबर ।
आवडे निरंतर तें चि रूप ॥ध्रु.॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं ।
कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥२॥
तुका म्हणे माझें हें चि सर्व सुख ।
पाहीन श्रीमुख आवडीनें ॥३॥

\- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला 'महाईन्यूज'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पवार गटाचे खातेवाटप ठरले !

## » अर्थखात्यासह एकूण 9 खाती अजित पवार गटाला मिळणार !

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**२ जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली आणि अजित पवार गट सत्तेत सामील झाला. अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथही घेतली. मात्र, शपथविधी होऊन जवळपास १० दिवस झाले असूनही अद्याप शपथ घेतलेल्या ९ मंत्र्यांना कोणत्याही खात्याचा कार्यभार सोपवण्यात आलेला नाही.**



अजित पवारांनाही अद्याप कोणतं खातं सोपवलेलं नाही. आधीच सरकारचा मंत्रीमंडळ विस्तार प्रलंबित असताना आता खातेवाटपाचीही प्रतीक्षा ताणली गेली आहे.

येत्या काही तासांत खातेवाटप होईल, असं उदय सामंत म्हणाले आहेत. त्यामुळे अजित पवार गटाला नेमकी कोणती खाती दिली जाणार? शिंदे गट व भाजपातील कोणत्या मंत्र्यांना त्यांची खाती अजित पवार गटासाठी सोडावी लागणार? यावर सध्या चर्चा चालू आहे. यासंदर्भात ९ खात्यांची सध्या जोरदार चर्चा चालू असून त्यात सध्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे असणाऱ्या अर्थखात्याचाही समावेश आहे. ७ जुलै रोजी राज्य सरकारकडून जारी करण्यात आलेल्या वीजदर सवलतीसंदर्भातल्या जीआरमध्ये एका उपसमितीचा उल्लेख करण्यात आला होता. यात देवेंद्र फडणवीसांचं नाव समितीचे अध्यक्ष म्हणून असलं, तरी वित्तमंत्री या पदासमोर कोणत्याही नावाचा उल्लेख नव्हता. यादीत फक्त मंत्री (वित्त) असा उल्लेख असल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या.

अजित पवारांसाठीच देवेंद्र फडणवीसांनी आपलं खातं सोडल्याचीही जोरदार चर्चा रंगली होती. अर्थखात्यासह शिंदेगट व भाजपाकडील एकूण ९ खाती अजित पवार गटाला मिळण्याची शक्यता आहे.

त्यामध्ये राज्य उत्पादन शुल्क विभाग, ग्रामविकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, महिला व बालकल्याण विभाग, पर्यटन विभाग, क्रीडा विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, औषध प्रशासन विभाग या खात्यांचा समावेश आहे. चर्चेत असणाऱ्या खात्यांची यादी पाहाता जी खाती महाविकास आघाडी सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडे होती, त्यातल्याच बहुतांश खात्यांचा चर्चेत असणाऱ्या या यादीत समावेश आहे. ठाकरे सरकारमध्ये अर्थखातं अजित पवारांकडे, ग्रामविकास खातं हसन मुश्रीफांकडे, सामाजिक न्याय खातं धनंजय मुंडेंकडे, अन्न व नागरी पुरवठा विभाग छगन भुजबळांकडे होता. आता या सरकारमध्येही तोच कित्ता पुन्हा गिरवला जाण्याची शक्यता आहे.

### आम्हाला 7 नवी मंत्रीपदं मिळणार – गोगावले



» दरम्यान, अजित पवार गटाला मिळू शकणाऱ्या खात्यांची चर्चा असताना दुसरीकडे शिंदे गटाकडून मात्र सध्याच्या ९ मंत्रीपदांशिवाय अतिरिक्त ७ मंत्रीपदं मिळणार असल्याचा दावा करण्यात येत आहे. शिंदे गटाचे प्रवक्ते भरत गोगावले यांनी पत्रकार परिषदेत बोलताना तसा दावा केल्यामुळे त्यावरूनही तर्क-वितर्कांना उधाण आलं आहे.

# ठाकरेंना मानसोपचारांची गरज

## » देवेंद्र फडणवीस यांचा ठाकरेंवर पलटवार

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उद्धव ठाकरेंची नागपूरचा कलंक ही टीका जिव्हारी लागल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी ठाकरेंवर अत्यंत तिखट शब्दांत पलटवार केला. माझे माजी मित्र उद्धव ठाकरेंची मानसिक स्थिती चांगली नाही. त्यांना मानसोपचार तज्ज्ञांची गरज आहे. त्यांची स्थिती आपण समजून घेतली पाहिजे, असे ते म्हणालेत.**



देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, आमचे आजचे विरोधक व माजी मित्र उद्धव ठाकरे यांच्यावर सध्याचा राजकारणाचा फारच विपरित परिणाम झाला आहे. कदाचित त्यांना मानसोपचार तज्ज्ञाचा सल्ला घ्यावा लागेल की काय? अशी स्थिती आहे. या मानसिक स्थितीतून ते बोलत असतील, तर त्याच्यावर फार काही बोलणे योग्य ठरणार नाही. त्यांची स्थिती सर्वांनी समजून घेतली पाहिजे. उद्धव ठाकरे यांनी सोमवारी नागपुरातील कायकर्ता मेळाव्यात देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली होती. त्यात त्यांनी त्यांचा उल्लेख नागपूरचा कलंक म्हणून केला होता. तेव्हापासून भाजपने ठाकरेंवर टीकेची झोड उठवली आहे. देवेंद्र फडणवीस नागपूरला लागलेला कलंक आहेत. ते आता उद्धव ठाकरेंनी पाठीत खंजीर खुपसल्याचा दावा करत आहेत. उद्धव ठाकरेच्या पाठीत खंजीर कुणी खुपसला? 2014 ते 2019 तुमच्याबरोबर सत्तेत होतो. 2014 साली शिवसेनेने नाही, तर तुम्ही युती तोडली. तेव्हा मी काँग्रेसबरोबर गेलो नव्हतो. मी तिथेच होतो. तिथेच आहे. वार करणारी तुमची अवलाद आहे माझी नाही, असे ठाकरे म्हणाले होते.

### अमोल कोल्हेंचा सत्ताधाऱ्यांवर निशाणा

» मिठाचा खडा टाकणारा शकुनीमामा कोण? महाराष्ट्र त्यांना कदापि माफ करणार नाही, अशा सूचक शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमोल कोल्हे यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे. कोल्हे यांनी आपल्या ट्विटमध्ये कोणत्याही नेत्याचे नाव घेतले नाही. पण त्यांचा रोख भाजप नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असल्याचा दावा केला जात आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील बंडखोरीमुळे राज्याच्या राजकारणात खळबळ माजली आहे. सध्या अजित पवार आपल्या सहकारी आमदारांसह शिवसेना - भाजप सरकारमध्ये सहभागी झालेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेचे शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांनी महाराष्ट्रातील शकुनीमामा कोण? असे सूचक विधान करत सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे.

# 95% आमदार स्वगृही येणार

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



राष्ट्रवादी काँग्रेससोबत बंडखोरी करणारे जवळपास 95 टक्के आमदार स्वगृही परत येतील, असा दावा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे नातू तथा आमदार रोहित पवार यांनी केला आहे. अजित पवारांसोबत नेमके किती आमदार गेले याची चर्चा सातत्याने होते. पण पुढील 10 ते 15 दिवसांत पाहा काय होते, असे सूचक विधान त्यांनी यासंबंधी केले आहे.

अजित पवारांच्या बंडाळीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवार व अजित पवार असे 2 उभे गट पडलेत. त्यात राष्ट्रवादीच्या बहुतांश आमदारांनी अजित पवारांच्या गटात जाणे पसंत केले आहे. यापैकी 9 आमदारांनी मंत्रिपदाची शपथही घेतली आहे. पण आमदार रोहित पवार यांनी शरद पवारांसोबतच राहण्यास प्राधान्य दिले आहे. ते विचारधारेच्या मुद्यावरून सातत्याने बंडखोर आमदारांवर हल्ला चढवत आहेत. आता त्यांनी बंडखोर आमदारांपैकी 90 ते 95 टक्के आमदार परत येतील, असा दावा केला आहे. अजित पवार यांच्यासोबत नेमके किती आमदार गेले? याची सातत्याने चर्चा सुरू आहे. पण पुढील 10 ते 15 दिवसांत काय होते ते तुम्ही पहाच, असे सूचक विधान रोहित पवार यांनी केले आहे. ते पुढे म्हणाले की, मला एक कळत नाही की, 36 चा आकडा आपल्याला कशाला पाहिजे. कारण, पक्षावर दावा सांगण्यासाठी दोन तृतीयांश बहुमत लागत नाही.

# बंगाल निवडणुकीचा निकाल

## टीएमसीने 18,606 ग्रामपंचायत जागा जिंकल्या; भाजपला 4,482

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पश्चिम बंगालमधील ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीसाठी सकाळी 8 वाजल्यापासून मतमोजणी सुरू आहे. सायंकाळी 7.30 वाजेपर्यंत ग्रामपंचायतींच्या 27,985 जागांचे निकाल लागले. टीएमसीने 18,606 ग्रामपंचायतीच्या जागा जिंकल्या आहेत. त्याच वेळी, ते 8,180 जागांवर आघाडीवर आहे.**



दुसरीकडे भाजपने 4,482 जागा जिंकल्या असून 2,419 जागांवर आघाडीवर आहे. काँग्रेसने 1,073 जागा जिंकल्या असून 693 जागांवर आघाडीवर आहे. माकपने 1,424 ग्रामपंचायतीच्या जागा जिंकल्या आहेत. तर डाव्या आघाडीला 1,502 जागा मिळाल्या आहेत. ओवेसी यांच्या पक्षाने बंगाल पंचायतीतही प्रवेश केला आहे. बंगाल ग्रामपंचायतीच्या 3 जागा AIMIM ने जिंकल्या आहेत. मालदामध्ये 2 आणि मुर्शिदाबादमध्ये 6 जागांसह पक्ष दुसऱ्या क्रमांकावर आहे. पंचायत समितीच्या जागांची आकडेवारीही बाहेर येऊ लागली आहे.

आत्तापर्यंत टीएमसीने 118 जागा जिंकल्या असून 782 जागांवर आघाडीवर आहे. त्याचबरोबर भाजप 79 जागांवर तर काँग्रेस 8 जागांवर आघाडीवर आहे.

तृणमूल काँग्रेसनेही जिल्हा परिषदेत 18 जागा जिंकल्या असून 64 जागांवर आघाडीवर आहे. मात्र, जिल्हा परिषदेच्या जागांवर भाजपचे खाते अद्याप उघडलेले नाही. बंगालमध्ये, 8 जुलै रोजी अनेक बूथवर हिंसाचार आणि बूथ कॅप्चरिंगच्या घटनांमध्ये 80.71% मतदानाची नोंद झाली. 8 जून रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून 10 जुलैपर्यंत निवडणूक हिंसाचारात 36 जणांचा मृत्यू झाला आहे.

बूथ कॅप्चरिंगच्या तक्रारींनंतर, निवडणूक आयोगाने सोमवारी (10 जुलै) 19 जिल्ह्यांतील 697 बूथवर फेरमतदान घेतले. 69.85% मतदान झाले आणि हिंसाचाराच्या कोणत्याही मोठ्या घटना घडल्या नाहीत. निकालांवरून दिसून येते की लोकांचा राज्य सरकारवर विश्वास आहे. भाजप आणि काँग्रेसचे फुटीरतावादी राजकारण जनतेने नाकारले आहे. 2024 साठी जनतेने काय विचार केला आहे हे यावरून कळते. अभिषेक बॅनर्जी म्हणाले की, विरोधकांनी नो व्होट फॉर ममता मोहीम सुरू केली होती, ज्याचा उलटा परिणाम झाला.

2024 मध्ये बंगालचे वारे कोणत्या मार्गाने वाहतील, हा विरोधकांना संदेश आहे. बंगालचे राज्यपाल सीव्ही आनंद बोस यांनी मंगळवारी हिंसाचारावर कारवाई करण्याचे सांगितले. ते म्हणाले, 'ज्यांनी बंगालमध्ये रस्त्यावर हिंसाचार पसरवला, ते ज्या दिवशी जन्माला आले त्या दिवशी शाप देतील. गुंड आणि कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी संपूर्ण यंत्रणा तैनात करण्यात येणार आहे.

### 9,013 जागांवर उमेदवार बिनविरोध

8 जुलै रोजी पश्चिम बंगालमधील 73,887 ग्रामपंचायत जागांपैकी 64,874 जागांवर मतदान झाले. उर्वरित 9,013 जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले. बिनविरोध निवडून आलेले सर्वाधिक 8,874 उमेदवार तृणमूल काँग्रेसचे आहेत. राज्यात केंद्रीय दलाच्या तैनातीनंतरही विविध भागातून हिंसाचाराच्या बातम्या येत आहेत. बूथ लुटणे, मतपत्रिका फाडणे, मतपत्रिका जाळणे अशा घटना अनेक भागांतून पाहायला मिळाल्या. कूचबिहारच्या मठभंगा-1 ब्लॉकच्या हजरहत गावात एक तरुण मतपेटी घेऊन पळून गेला.

# राहुल गांधींनी दिला काँग्रेसला सल्ला

## लोकसभा निवडणुकीची तयारी करण्याच्या सूचना

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेस नेतृत्वाने महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्यांना आगामी लोकसभा निवडणुकीची तयारी करण्यास सांगितले आहे. कर्नाटकच्या धर्तीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि पक्षाचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी राज्यातील नेत्यांना संपूर्ण एकजुटीने निवडणुकीत उतरण्याचा सल्ला दिला आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार यांच्या बंडखोरीनंतर महाराष्ट्रातील बदललेल्या राजकीय वातावरणाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेतृत्वाने मंगळवारी राज्यातील वरिष्ठ नेत्यांची बैठक घेतली. या बैठकीत महाराष्ट्रातील २५ नेते सहभागी झाले होते. काँग्रेस नेत्यांची बैठक ४ ते ५ तास चालली. एच के पाटील मंत्री झाल्यानंतर आता राज्यात नवा प्रभारी दिला जाणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे प्रभारी एच के पाटील यांच्या कामावर नाराज आहेत. नवीन प्रभारी देताना भांडण न लावणारा आणि सगळ्या जिल्ह्यात फिरणारा द्या, अशी मागणी नाना पटोले यांनी बैठकीत पक्षश्रेष्ठींकडे केली. तसेच वरिष्ठांनी देखील नाना पटोले यांनी काही सल्ले दिले आहेत. नाना पटोले यांनी नेत्यांच्या मतदारसंघात जाताना स्थानिक नेत्यांशी संपर्क साधावा. तिथं कुठलाही वाद होणार नाही याची काळजी पटोले यांनी घ्यावी. विजय वड्डेट्टीवार यांना खर्गे यांनी शांत राहण्याचा सल्ला दिला. तसेच आमदार वर्षा गायकवाड या बैठकीत शेवटी बोलल्या म्हणून राहुल गांधी नाराज झाले होते. महिलांना बोलायला अगोदर संधी द्यायला हवी अशी सक्त ताकीद राहुल गांधी यांनी पक्षाच्या नेत्यांना दिली. राहुल गांधी यांनी सर्व नेत्यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना न दुखवता राज्यात काम करण्याचा संदेश दिला आहे. आगामी काळात राज्यात काँग्रेस एक नंबरचा पक्ष राहील. कर्नाटक विजयानंतर राज्यात देखील आपण जिंकू शकतो ही खात्री आपल्याला आली आहे, त्यामुळं थेट लोकांशी संपर्क वाढवा.

### वंचित बहुजन आघाडीला सोबत घ्या

वंचित बहुजन आघाडीला सोबत घ्यावं अस मतं काही नेत्यांनी बैठकीत मांडलं. कारण 2019 ला वंचितमुळे मोठा फटका बसला होता. तो पुन्हा बसू नये यासाठी ते (प्रकाश आंबेडकर) सोबत आले तर फायदा होऊ शकतो, अशी चर्चा बैठकीत झाल्याची माहिती आहे.

# 'वंदे भारत' ट्रेनवर दगडफेक

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गोरखपूरहून लखनऊला जाणाऱ्या 'वंदे भारत' एक्सप्रेस ट्रेनवर दगडफेक झाल्याची घटना समोर आली आहे. वंदे भारत (२२५४९) या हायस्पीड ट्रेनवर लोहमार्गाच्या दोन्ही बाजूंनी दगडफेक करण्यात आली.**

यामध्ये रेल्वेच्या दोन डब्यांच्या काचा फुटल्या आहेत. ही घटना अयोध्येतील सोहवाल रेल्वे स्थानकाजवळ घडली. विशेष म्हणजे यापूर्वी देशातील विविध मार्गांवर धावणाऱ्या 'वंदे भारत' एक्स्प्रेस ट्रेनला लक्ष्य करण्यात आलं आहे. या घटनेची माहिती मिळताच आरपीएफ आणि स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी मुन्नू पासवान आणि त्यांची दोन मुलं अजय पासवान आणि विजय पासवान यांच्यासह तिघांना अटक केली आहे. त्यांनीच 'वंदे भारत'वर दगडफेक केल्याची पुष्टी करण्यात आली आहे. या रेल्वेवर दगडफेक करण्याचं कारणंही तपासात उघड झालं आहे.९ जुलै रोजी 'वंदे भारत' एक्स्प्रेस ट्रेनने आरोपींच्या शेळ्यांना धडक दिली होती. या धडकेत रेल्वे रुळावर चरणाऱ्या सहा शेळ्यांचा मृत्यू झाला होता. या शेळ्यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी संतप्त आरोपींनी 'वंदे भारत'वर दगडफेक केली आहे.

# पत्नीसह फिरायला गेला आशिष विद्यार्थी

अभिनेते आशिष विद्यार्थी यांनी काही महिन्यांपूर्वी रुपाली बरुआसोबत लग्न केले आहे. लग्नानंतर हे जोडपे हनिमूनसाठी सिंगापूरला गेले होते आणि पुन्हा एकदा दोघे बालीमध्ये एकत्र फिरताना दिसत आहेत. या जोडप्याने सोमवारी त्यांच्या बाली व्हॅकेशनचे फोटो शेअर केले. शेअर केलेल्या फोटोमध्ये हे कपल बालीच्या हिरवाईचा आणि तेथील निसर्गाचा आनंद लुटताना दिसत आहे. त्यांच्या इन्स्टाग्रामवर हा फोटो शेअर करत रुपाली आणि आशिषने लिहिले- 'ग्लोरी ऑफ टुगेदरनेस.' शेअर केलेल्या फोटोमध्ये रुपाली बोहेमियन ड्रेसमध्ये दिसत आहे, तर अभिनेता प्रिंटेड शर्टमध्ये कॅज्युअल लूकमध्ये दिसत आहे. आशिष विद्यार्थ्यांनी 19 जून रोजी आपला 58 वा वाढदिवस साजरा केला. यावेळी या जोडप्याने पत्नी रुपाली बरुआसोबत व्हॅकेशन साजरा करतानाचा फोटो सोशल मीडियावर पोस्ट केला. या फोटोत आशिष पत्नी रुपालीसोबत टुरिस्ट बसमध्ये बसलेले दिसत होते. दोघेही कॅमेराकडे बघत हसत होते. आशिष यांच्या पोस्टवर लोक त्यांना वयाच्या ५७ व्या वर्षी दुसरे लग्न केल्याबद्दल ट्रोल करत आहेत. एका ट्रोलरने लिहिले - काका, ही तुमची एकमेव ऐश आहे. आणखी एका युजरने लिहिले - मुलगी आसामची आहे, मला त्यांच्या लग्नाविषयी कोणतीही अडचण नाही, पण मला त्यांच्या माजी पत्नीचे खूप वाईट वाटते. त्यांचे काय चालले आहे, फक्त तीच समजू शकते. एका चाहत्याने लिहिले- 'नवीन जोडीदाराचे अभिनंदन, आम्ही तुझ्यावर प्रेम करतो रब राख.' आणखी एका चाहत्याने लिहिले - रब ने बना दी जोडी ज्येष्ठ अभिनेते आशिष विद्यार्थी यांनी 25 मे रोजी दुसरं लग्न पार पाडलं. आसामची राजधानी गुवाहाटी येथील फॅशन डिझायनर आणि बिझनेसवुमन रुपाली बरुआ हिच्याशी त्यांचे लग्न झाले आहे. अभिनेत्री शकुंतला बरुआ यांची मुलगी राजोशी बरुआ ही आशिष विद्यार्थीची पहिली पत्नी आहे. आशिषने रूपालीशी त्याच्या मित्रपरिवाराच्या उपस्थितीत कोर्टात लग्न केले. यावेळी रुपाली आसामच्या पारंपारिक पांढऱ्या आणि सोनेरी मेखला चादरमध्ये दिसली. दुसरीकडे केरळची परंपरा लक्षात घेऊन आशिषने त्याच रंगाचा मुंडू परिधान केला होता. आशिष विद्यार्थी बॉलिवूड चित्रपटांमध्ये खलनायकाच्या भूमिकेसाठी ओळखला जातो. 1986 पासून आशिष सतत चित्रपटांमध्ये काम करत आहे.

# 'प्रीती झिंटामुळे झाला माझा घटस्फोट'!

प्रसिद्ध अभिनेत्री सुचित्रा कृष्णमूर्ती आणि प्रख्यात दिग्दर्शक शेखर कपूर यांच्या घटस्फोटाला १५ वर्षे होऊन गेलीत. मात्र तो कुणामुळे झाला याविषयी सुचित्रानं एका मुलाखतीमध्ये धक्कादायक खुलासा केला आहे. तिनं थेट प्रीती झिंटाचे नाव त्यात घेतले आहे. सुचित्रानं बॉलीवूड ठिकानाला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये प्रीतिच्या त्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. २००० साली सुचित्रानं प्रीतिवर तिचं घर तोडल्याचा आरोप केला होता.



त्यावेळी प्रीतिनं म्हटलं होतं की, मी सगळ्यात आघाडीची अभिनेत्री आहे. आणि तू तर कामही करत नाही. साधी गृहिणी आहेस. तेव्हा तू माझ्याशी असं बोलू नकोस. एखाद्या मानसोपचारतज्ञाची मदत घे. असा सल्ला प्रीतिनं सुचित्राला दिला होता. सुचित्रानं आता प्रीतिच्या त्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. असं म्हटलं जातं की, प्रीतीनं तिच्या त्या वक्तव्यामुळे सुचित्राची माफीही मागितली होती. पण तोपर्यंत खूप उशीरही झाला होता.

प्रीतिनं सुचित्राला फोन करुन माफी मागितल्याचे बोलले जाते. तसेच तिनं सुचित्राला तिच्या पहिल्या चित्रपटाच्या जानेमनच्या स्क्रिनिंगला बोलावले होते, मात्र ती काही गेली नाही. एका मुलाखतीमध्ये सुचित्रानं सांगितलं होतं की, मी अजूनपर्यंत तिला माफ केलेलं नाही. ती माझ्यासाठी कुणीही नाही. मला तिला माफ करण्याची काही एक गरजही नाही. कारण आता माझ्यालेखी तिचे काहीही महत्व नाही. मी खूप आनंदी आहे. सध्या जे काही माझ्या आयुष्यात सुरु आहे त्यामुळे मी गतकाळाविषयी बोलू इच्छित नाही. पण ज्या माणसांशी कधीच संवाद साधायचा नाही असे ठरवले ते नियम मात्र काही केल्या मोडणार नाही.



# 'बाईपण भारी देवा'

दिग्दर्शित 'बाईपण भारी देवा' (BAIPAN BHAARI DEVA) हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. पाच कोटींच्या बजेटमध्ये निर्मिती करण्यात आलेल्या या सिनेमाने रिलीजच्या दहा दिवसांत 26.19 कोटींची कमाई केली आहे. 'बाईपण भारी देवा' या सिनेमाबद्दल बोलताना एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत केदार शिंदे म्हणाले,"मी हा सिनेमा पुरुषांसाठी बनवला आहे. या सिनेमाला मिळत असलेलं यश पाहून नक्कीच आनंद होत आहे. हा सिनेमा आता आमचा नसून मायबाप प्रेक्षकांचा झाला आहे. ". 'बाईपण भारी देवा' या सिनेमाचं दिग्दर्शन केदार शिंदे यांनी केलं आहे. पण हा सिनेमा करावासा का वाटला याबद्दल बोलताना ते म्हणाले,"बाईपण भारी देवा' या सिनेमाची गोष्ट ऐकल्यानंतर मला या सिनेमाचं तिकीट काढावसं वाटलं. फायदा तोटा यापेक्षा काम करण्याकडे मी जास्त लक्ष दिलं. चांगले सिनेमे असतील तर ते पाहायला प्रेक्षक नक्कीच येतात, असं मलाही जाणवलं आहे. लोकांना काय पाहायचं आहे, त्यांची काय मानसिकता आहे.

# तिला अभिनय येत नाही : नवाज

बॉलिवूड अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी आणि बबली गर्ल अशी ओळख असणारी शहनाज गिलचे पहिले रोमँटिक गाणे 'यार का साताया हुआ' प्रदर्शित झाले आहे. या गाण्याला प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळत आहे. पण एक समीक्षक असाही आहे ज्याला हे गाणे आवडले नाही. शिवाय त्याने नवाजुद्दीन आणि शहनाजच्या जोडीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हा टीकाकार दुसरा तिसरा कोणी नसून कमाल आर खान म्हणजेच केआरके आहे. प्रत्येक मुद्द्यावर भाष्य करत केआरकेने या गाण्यासोबतच नवाज आणि शहनाजच्या केमिस्ट्रीवरही भाष्य केले आहे. शहनाज आणि नवाजच्या नवीन व्हिडिओ गाण्यावर प्रतिक्रिया देत त्यांनी एक ट्विट केले आहे. ज्यामध्ये केआरकेने लिहिले- "आज मी नवाजुद्दीन आणि शहनाज गिलचे गाणे पाहिले. अरे देवा ते किती भयानक होते. नवाज डान्स करत आहे आणि शहनाज अभिनेत्रीसारखी कमी आणि छिछोरीसारखी जास्त दिसतेय. या मुलीला अभिनय अजिबात माहित नाही." मात्र, केआरकेच्या या ट्विटनंतर नवाज आणि शहनाजचे चाहते त्यांची खूप शाळा घेत आहेत.



एका युजरने केआरकेला ट्रोल केले आणि लिहिले- "सर, तुम्ही प्रसिद्ध आणि प्रतिभावान लोकांना सडलेले आणि काळे- पिवळे आणि ढोलकी वगैरे म्हणत असता... तुम्ही तुमच्या चेहऱ्याबद्दल आणि प्रतिभेबद्दलही काहीतरी सांगा... तुम्हाला इतरांचे यश सहन होत नाही. " त्याचवेळी दुसऱ्या युजरने लिहिले- "तू वेडा आहेस का? हे गाणे यशस्वीपणे नंबर १ वर चालू आहे आणि ते ही जागतिक स्तरावर... तू नेहमी इतरांचे वाईट चिंततोस. शहनाजचा अभिनय शानदार होता... कृपया आधी स्वतःचे चित्रपटांची काळजी घे याशिवाय अनेकांनी कमाल आर खान यांच्यावर आणखी काही जोरदार टीका केल्या आहेत.



# दारुडा 'स्पायडर मॅन'

ज्यांनी टॉम हॉलंडचा स्पायडर मॅन पाहिला असेल त्यांना त्याच्या भूमिकेविषयी वेगळं काही सांगण्याची गरज नाही. हॉलीवूडमध्ये आपल्या नावानं टॉमनं त्याची वेगळी ओळख निर्माण केली. त्याचा चाहतावर्ग मोठा आहे. त्याला इंस्टावर फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. लहानपणापासून चित्रपटांची आणि अभिनयाची आवड असणाऱ्या टॉमची एक मुलाखत सध्या लक्ष वेधून घेताना दिसत आहे.हॉलंडनं त्याच्या मद्यपानाच्या सवयीविषयी सांगितलं आहे. त्यामुळे त्याच्या शेकडो चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. आपण त्यावेळी मद्याच्या प्रचंड आहारी गेलो होतो आणि त्याशिवाय दुसरे काही सुचतच नव्हते. अशा शब्दांत टॉमनं त्याच्या गतकाळाविषयी सांगितलं आहे. त्यामुळे त्याच्या त्या आठवणींविषयी चाहत्यांनी त्याला अधिक बोलतं करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याला वेगवेगळे प्रश्न विचारुन भंडावूनही सोडले आहे.आपण मद्यपानाची सवय कशी बंद केली याविषयी टॉमनं यावेळी सांगितले आहे. त्यात तो म्हणतो, मी पहिल्यांदा एक महिनाभर दारुला हात लावायचा नाही. असे ठरवले. आणि तो नियम काटेकोरपणे पाळला. मला खूप त्रासही झाला होता. पण जे ठरवले त्याला तडा जाऊ दिला नाही. यावेळी माझ्या मानसिकतेचा कस लागला होता. नंतर त्या गोष्टीचे मला फायदेही जाणवू लागले. मला चांगली झोप लागली, माझ्या प्रकृतीत सुधारणाही झाली.जे शेट्टीच्या पॉडकास्टमध्ये हॉलंड सहभागी झाला होता. यावेळी त्यानं आपल्या वाईट सवयी आणि शेवटी त्यावर केलेली मात याविषयी तो दिलखुलासपणे बोलला. त्याच्या त्या पॉडकास्टचे कौतूक होताना दिसत आहे. आमच्या घरात दारुची सवय कित्येक मोठ्या माणसांना होती. मात्र त्यात कुणी वाहवत गेले नव्हते. माझ्याबाबत मात्र झाले ते उलटेच. काही काळ मी वाहवत गेलो. पण आता पुन्हा जागेवर आल्याचे स्पायडर मॅन फेम हॉलंडने सांगितले आहे. एकदा तुम्हाला अल्कोहोलची सवय लागली की मग ती सुटणे कठीण गोष्ट आहे. त्यासाठी तुम्हाला खूपच खंबीर असावे लागते. तुमच्या मानसिकतेचा कस लागतो. यासगळ्यावर मला खूपच मेहनतीनं मात करता आली. लोकं तुमच्याकडे पाहतात,

# भारताच्या लेकींची कमाल !

## » बांगलादेशचा 87 धावांत खुर्दा, दिप्ती-शेफालीचा भेदक मारा

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात भारतीय महिला संघाने दुसऱ्या टी20 सामन्यात बांगलादेशचा अवघ्या 8 धावांनी पराभव केला. या विजयासह भारतीय संघाने तीन सामन्याच्या मालिकेत 2-0 ने बाजी मारली आहे. पहिल्या टी 20 सामन्यात भारताने सात विकेटने विजय मिळवला होता. आज झालेल्या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना फक्त 95 धावांपर्यंत मजल मारली होती. हा सामना बांगलादेश महिला संघ जिंकणार असे वाटले, पण दिप्ती शर्मा आणि शेफाली वर्मा यांच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर बांगलादेशचा संघ 87 धावांत गारद झाला.**

लो स्कोरिंग सामन्यात भारतीय महिला गोलंदाजांनी दमदार कामगिरी केली. टीम इंडियासाठी दीप्ती शर्मा आणि शेफाली वर्मा यांनी प्रत्येकी तीन तीन विकेट घेतल्या तर मिन्नू मणी हिने 2 विकेट घेण्याचा पराक्रम केला. भारताने दिलेल्या 96 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशची सुरुवात खराब झाली. सुल्ताना अवघ्या पाच धावा काढून तंबूत परतली..तिला फक्त चार चेंडूंचा सामना करता आला. त्यानंतर मुर्शिदा खातून हिने 15 चेंडूचा सामना करताना फक्त चार धावा केल्या. रितु मोनी हिने 6 चेंडूत 4 धावा केल्या. शोरना अख्तर हिने 17 चेंडूत सात धावा केल्या. कर्णधार निगर सुल्ताना हिने एकाकी झुंज गिली. सुल्ताना हिने 38 धावांची महत्वपूर्ण खेळी केली. 55 चेंडूचा सामना करताना दोन चौकारांच्या मदतीने तीने 38 धावांची खेळी केली.



### दिप्ती शेफालीचा भेदक मारा

भारताकडून दिप्ती शर्मा आणि शेफाली वर्मा यांनी भेदक मारा केला. शेफालीने 3 षटकात 15 धावांच्या मोबदल्यात 3 विकेट घेतल्या. मिन्नू मणी हिने 4 षटकात 9 धावांच्या मोबदल्यात दोन विकेट घेतल्या.. अनुषा हिने 4 षटकात 20 धावा देत एक विकेट घेतली. पूजा वस्त्राकर हिने एका षटकात 10 विकेठ खर्च केल्या पण एकही विकेट मिळाली नाही.

दिप्ती शर्मा हिने बांगलादेशची कर्णधार तुल्तानाला बाद केले. फहिमा खातून आणि मारूफा अख्तर यांना खातेही उघडता आले नाही.

भारताकडून दिप्ती शर्मा आणि शेफाली वर्मा यांनी भेदक मारा केला. दिप्तीने चार षटकार 12 धावांच्या मोबदल्यात तीन विकेट घेतल्या. शेफालीने 3 षटकात 15 धावांच्या मोबदल्यात 3 विकेट घेतल्या. मिन्नू मणी हिने 4 षटकात 9 धावांच्या मोबद्लयात दोन विकेट घेतल्या.. अनुषा हिने 4 षटकात 20 धावा देत एक विकेट घेतली. पूजा वस्त्राकर हिने एका षटकात 10 विकेठ खर्च केल्या पण एकही विकेट मिळाली नाही.

भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना आठ विकेटच्या मोबदल्यात फक्त 95 धावांपर्यंत मजल मारली. भारताकडून सर्वाधिक धावा शेफाली वर्मा हिने केल्या. शेफालीने 14 चेंडूत 4 चौकारांच्या मदतीने 19 धावा केल्या. यास्तिका भाटिया हिने 13 चेंडूत 11 धावा केल्या.

स्मृती मंधाना हिने 13 धावांचे योगदान दिले. अमनजोत कौर हिने 14 धावांची भर घातली. मिन्नू मणी हिने नाबाद 5 आणि पूजा वस्त्राकर हिने नाबाद 7 धावा काढल्या.

# मैदानात विराट उतरणार

## » आधी बाप, आता मुलाविरोधात खेळणार

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**बुधवारपासून भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात कसोटी मालिकेला सुरुवात होणार आहे. मालिकेचा पहिला कसोटी सामना डोमिनिकाच्या विंडसर पार्कमध्ये खेळवला जाणार आहे. पहिला कसोटी सामना खेळण्यासाठी मैदानात उतरल्यानंतर विराट कोहली एका खास क्लबमध्ये सामील होणार आहे. क्रिकेट करिअरमध्ये बाप आणि मुलाविरोधात खेळणाऱ्या खेळाडूच्या यादीत विराट कोहलीचे नाव होणार आहे. याआधी भारताकडून सचिन तेंडुलकर याने हा पराक्रम केला आहे.**

विराट कोहलीने 12 वर्षांपूर्वी वेस्ट इंडिजविरोधात कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्यावेळी वेस्ट इंडिजच्या संघात शिवनारायण चंद्रपॉल होता... आता वेस्ट इंडिजच्या संघात शिवनारायण चंद्रपॉलचा मुलगा तेजनारायण खेळत आहे. विराट कोहली बाप आणि मुलाविरोधात खेळणारा भारताचा दुसरा खेळाडू होणार आहे. याआधी सचिन तेंडुलकर याने असा पराक्रम केला आहे. 1992 मध्ये सचिन तेंडुलकर ऑस्ट्रेलियाच्या ज्योफ मार्श याच्याविरोधात खेळला होता. त्यानंतर 2011-12 मध्ये सचिन आणि ज्योफ मार्शचा मुलगा शॉन मार्श याच्याविरोधात मैदानात उतरला. विराट कोहली आता सचिन तेंडुलकरच्या खास क्लबमध्ये सामील होणार आहे. शिवनारायण चंद्रपॉल याने भारताविरोधात नेहमीच खोऱ्याने धावा काढल्या आहेत. मुलगा तेजनारायण कशी कामगिरी करतो, याकडे क्रीडा चाहत्यांचे लक्ष लागलेय. तेजनारायण सलामी फलंदाजाची भूमिका पार पाडतो. आतापर्यंत तेजनारायण याने दमदार प्रदर्शन केलेय. तेजनारायण याने सहा सामन्यात 11 डावात 45.30 च्या सरासरीने 453 धावा काढल्या आहेत. यादरम्यान तेजनारायण याने एक शतक आणि एक अर्धशतक झळकावलेय. तेजनारायण याची कसोटीतील सर्वोच्च धावसंख्या 207 इतकी आहे. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात आतापर्यंत 98 कसोटी सामने झाले आहेत. यामध्ये भारतीय संघाने 22 सामन्यात विजय मिळवलाय. तर 30 सामने वेस्ट इंडिजने जिंकलेत. 46 सामने अनिर्णित राहिलेत. 2002 पासून भारताने वेस्ट इंडिजविरोधात एकही कसोटी मालिका गमावलेली नाही.



# 23व्या कबड्डी दिनाचे पुरस्कार घोषित

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने 15 जुलै हा कबड्डीमहर्षी स्व. शंकरराव(बुवा) साळवी यांचा जन्मदिन "कबड्डी दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त किशोर, कुमार व खुला गट राष्ट्रीय स्पर्धेत विशेष प्रावीण्य दाखविणाऱ्या खेळाडूंना रोख रकमेची शिष्यवृत्ती देण्यात येते. तसेच महाराष्ट्राच्याकरिता गौरवास्पद कार्य करणारे ज्येष्ठ कार्यकर्ते, पंच, खेळाडू, संघटक, तसेच खेळाच्या प्रसिद्धीसाठी मेहनत घेणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार यांचा शाल, श्रीफळ,अमृत कलश देऊन सन्मान करण्यात येतो.**

यंदापासून "स्व.फिदा कुरेशी" यांच्या नावाने सुरू करण्यात आलेला ज्येष्ठ प्रशिक्षक पुरस्कार शरद चव्हाण- पुणे, अनिल घाटे- मुंबई शहर, सुरेश मापुसकर- ठाणे, राजेंद्र महाजन- मुंबई शहर, यांना जाहीर.

परभणीच्या कबड्डी करीता अतुलनीय योगदान देणारे मंगल पांडे यांना "कृतज्ञता" पुरस्कार, तर सुभाष हरचेकर पुण्यनगरी - मुंबई, राजेंद्र काळोखे लोकमत - पुणे, सूरज कदम तेजोन्नती परभणी, इक्बाल जमादार रत्नागिरी टाइम्स यांना ज्येष्ठ क्रीडा - पत्रकार पुरस्कार.

पुण्यात महिलेचे प्राण वाचविणाऱ्या लेशपाल जवळगेला "धर्याशील पुरस्काराने" विशेष सन्मान करण्यात येणार आहे. नाशिकचा आकाश शिंदेला स्व. मधुसूदन पाटील, तर मुंबई उपनगरच्या हरजितसिंग कौर संधूला स्व. अरुणा साटम पुरस्कार. अहमदनगरचा आदित्य शिंदे व पुण्याची सलोनी गजमल यांना स्व. मल्हारराव बावचकर पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे.